# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी - 022 – 2654 3035/2653 0283
ई-मेल - cap@exam.mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०९८.


क्र.परीक्षा/कें.मु.कें./ १८९ /२०१३ दिनांक :- १९ मार्च, २०१३

परीपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
अभियांत्रिकी विद्याशाखा.

विषय : पुर्नमुल्यांकनाचे व उत्तरपत्रिकेची छायांकीत प्रत मिळणेबाबतचा अर्ज ऑनलाईन प्रक्रियेद्वारे स्विकारणेबाबत...

महोदय / महोदया,

द्वितीय सत्र, २०१२ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी ( सत्र - १ व २ ) परीक्षांचे निकाल जाहीर झाले असून निकालपत्रकही लवकरच पाठविले जाणार आहे. तदनंतर लगेचच पुर्नमुल्यांकनाचे व उत्तरपत्रिकेची छायांकीत प्रत मिळणेबाबतचा अर्ज (Revaluation & Photocopy) स्विकारण्यास सुरूवात होणार आहे. पुर्नमुल्यांकनाची व उत्तरपत्रिकेची छायांकीत प्रत मिळणेबाबतची संपूर्ण प्रक्रिया गतिमान होण्यासाठी व निकाल वेळेत लागावे यासाठी सदर कामाचे संगणकीकरण करावयाचे प्रस्तावित आहे, त्यासाठी पहीला टप्पा म्हणून प्रायोगिक तत्वावर ( Pilot Project ) प्रथम वर्ष अभियांत्रिकी ( सत्र - १ व २ ) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे पुर्नमुल्यांकनाचे व उत्तरपत्रिकेची छायांकीत प्रत मिळणेबाबतचे अर्ज ऑनलाईन प्रक्रियेद्वारे स्विकारावे असेही प्रस्तावित आहे. त्यासाठी विद्यापिठाच्या संकेतस्थळावरील "**Examinations**" या लिंकवर क्लिक करावे तदनंतर **Application for Revaluation / Photocopy** या बटनावर क्लिक करताच अर्जाच्या नोंदणीची प्रक्रिया सुरू होईल. (नोंदणी प्रक्रियेचे मुख्य टप्पे सोबतच्या तक्त्यात दिले आहेत).

ही सर्व प्रक्रिया Menu Driven Programme द्वारे संचलीत केलेली असल्यामुळे नोंदणी प्रक्रियेतील क्रमवार टप्पे पूर्ण झाल्यानंतर नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईल व विद्यार्थ्याच्या अर्जाची नोंद केली जाईल. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्याने सदर अर्जाची प्रिंटआऊट काढून त्यासोबत आवश्यक ते शुल्क व सोबतची सर्व आवश्यक सहपत्रे जोडून आपला अर्ज संबंधित महाविद्यालयात जमा करावयाचा आहे. अशाप्रकारे सर्व जमा झालेले अर्ज कुलगुरूंचे निर्देश क्र.**VCD/4637/2010** मधील तरतुदीनुसार महाविद्यालयाने विहीत मुदतीत म्हणजेच फोटोकॉपीसाठीचे अर्ज पुढील तीन / पुर्नमुल्यांकनाचे अर्ज पुढील सात कामाच्या दिवसात विद्यापिठाकडे सादर करावयाचे आहेत. अशाप्रकारे अर्जाची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी विद्यार्थ्यास कुठल्याही इंटरनेट असलेल्या संगणकावरून किंवा सायबरकॅफेमधून किंवा महाविद्यालयाच्या कार्यालयातून / संगणक कक्षातून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करता येईल.

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी - 022 – 2654 3035/2653 0283
ई-मेल - cap@exam.mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०९८.


अशाप्रकारे नोंदणीची प्रक्रिया ( **Online** ) विहीत मुदतीत दिवसरात्र सूरू राहणार असून सदर ऑनलाईन सुविधा विहित केलेल्या मुदतीनंतर ( निकालपत्र प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसांच्या आत ) शेवटच्या दिवशी सायंकाळी ६.00 वा. आपोआप बंद होणार असून तदनंतर कुठल्याही परिस्थितीत व कुठल्याही कारणास्तव अर्ज स्विकारले जाणार नाहीत. त्याचप्रमाणे प्रथम वर्ष अभियांत्रिकी ( सत्र - १ व २ ) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जच स्विकारण्यात येणार असून जून्या पध्दतीचे लिखीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

यावर्षी प्रायोगिक तत्वावरील (Pilot Project) सूरू केलेल्या सदर सुविधेतील त्रुटी दूर करून पुढील वर्षी ही सुविधा सर्वच परीक्षांसाठी सूरू करण्याचे प्रस्तावित आहे. मात्र यावर्षी ही सुविधा फक्त प्रथम सत्र अभियांत्रिकी ( सत्र - १ व २ ) अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे पुर्नमुल्यांकन व उत्तरपत्रिकेची छायांकीत प्रत मिळण्यासाठी सूरू केलेली असून इतर सर्व विद्यार्थ्यांनी जून्या पद्धतीने लेखी अर्ज सादर करावयाचे आहेत. याची कृपया नोंद घ्यावी. ही संपूर्ण **Online** नोंदणीची प्रक्रिया अत्यंत सोपी असून संगणक साक्षर असलेल्या कुणाही विद्यार्थ्याला करता येईल मात्र तरीही काही अडचणी असल्यास महाविद्यालयातील संगणक केंद्रावरून अर्ज भरण्यासाठी सहकार्य करण्यात यावे.

विद्यार्थ्याने संपूर्ण भरलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढावी व त्यासोबत मार्कशिटची, प्रश्नपत्रिकेची छायांकीत प्रत व मागासवर्गिय किंवा आर्थिक मागास गटातील असल्यास जातीचा / आर्थिक मागास गटातील असल्याबाबतचा दाखल्याची छायांकीत प्रत व आवश्यक शुल्क महाविद्यायलात जमा करावयाचे आहे. महाविद्यालयाने सर्व अर्जदार विद्यार्थ्यांची यादी ( पूर्नमुल्यांकन व छायांकीत प्रतीसाठी दोन स्वतंत्र ) तयार करून सोबत सर्व अर्ज सहपत्रांसह जोडून व एकत्रीत शुल्क रक्कमेसह विद्यापीठास विहीत मुदतीत पाठविणे आवश्यक आहे. अपूर्ण, स्वाक्षरी नसलेले, सर्व आवश्यक सहपत्रे न जोडलेले अर्ज तसेच विहित शुल्कासह नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याचीही नोंद घ्यावी व तसे सर्व विद्यार्थ्यांच्या माहीतीसाठी सूचनाफलकावर प्रदर्शीत करावे.

सदर परिपत्रकास सर्वकष प्रसिद्धी देऊन प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे अर्ज **Online** भरण्यास प्रोत्साहन द्यावे व त्यासाठी त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य करावे ही विनंती.

धन्यवाद.

आपला,

दिपक वसावे
( स्थानापन्न परीक्षा नियंत्रक )